# पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णा नायकवडी यांचा जीवनपट
## एका दृष्टिक्षेपात (अल्पपरिचय)

❖ नागनाथ रामचंद्र नायकवडी यांना
क्रांतिवीर नागनाथ नायकवडी आणि नागनाथअण्णा म्हणून महाराष्ट्रात आणि भारतभर ओळख.

❖ जन्मगाव मु.पो.वाळवे, ता.वाळवे, जिल्हा सांगली.पिन ४१६३१३.

❖ पत्ता :- मु.पो.ता.वाळवे, जिल्हा सांगली.
फोन नं. (एस.टी.डी.कोड ०२३४२) २६७५२२, २६७५४०, २६७५४१.
फॅक्स नं. ०२३४२ / २६७५३९
Email : ast_hkl@bsnl.in

❖ जन्मतारीख :- १५ जूलै १९२२

❖ वडीलांचे नांव :- श्री.रामचंद्र गणपती नायकवडी (कष्टकरी शेतकरी)

❖ आईचे नांव :- क्रांतिवीरांगना लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी.
दोघांचाही स्वातंत्र्य चळवळीत सहभाग .

❖ शिक्षण :- इयत्ता १ ली ते ६ वी पर्यन्त वाळवे येथे.
इयत्ता ७ वी आष्टा येथे.
इयत्ता ८ वी ते मॅट्रीक राजाराम हायस्कूल कोल्हापूर.
१९४२ साली मॅट्रीक शिक्षण अर्ध्यावर सोडून भूमिगत चळवळीत सहभाग.
स्वातंत्र्यानंतर सन १९४७-४८ ला मॅट्रीक पास.
राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे एफ.वाय. ला प्रवेश.

अण्णांच्या लढावू चळवळीतील सहभागावर नियंत्रण आणण्याच्या दुष्ट हेतुने महाराष्ट्राच्या मोरारजी सरकारने वॉरंट काढल्यामुळे पुन्हा भूमिगत राहावे लागल्याने आणि भागातील गावगुंडांच्या बंदोबस्तासाठी कराव्या लागलेल्या कार्यामुळे नाईलाजाने शिक्षण सोडले.

❖ आष्टा येथे शिकत असताना श्री.हणमंत गणेश नवांगुळ (शिराळा) आणि कोल्हापूर येथे शिकताना श्री.अय्यर सर यांचे खास मार्गदर्शन आणि सहवास.

❖ व्यायामशाळेत देसाईवस्ताद व साटम यांचे मार्गदर्शन.

❖ प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डींग, कोल्हापूर या गरीब मुलांसाठीच्या वसतिगृहात राहून प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण पुर्ण.

❖ बोर्डिंगमध्ये राहून शिक्षण घेत असताना कांही काळ शिवाजी पेठेत 'वार लावून' जेवण.

❖ १९३० साली वाळवा येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सभाना प्रारंभ. त्यावेळेपासून त्यांच्या प्रचार फेरीत सर्वात प्रथम येऊन काँग्रेसचा झेंडा घेऊन न चुकता भाग घेणारा विद्यार्थी म्हणून नाना पाटलांच्या नेतृत्वाचा मनावर खोलवर प्रभाव.

❖ पहिला जिवलग मित्र बी.एल.गायकवाड (चर्मकार समाजातील), वाळवे.

❖ मे १९३९ :- सखाराम मकदम, गणपती गोविंद बाबर गुरूजी (गोटखिंडी) या विद्यार्थी सहकाऱ्यांसोबत, नंतरच्या काळात रयत शिक्षण संस्थेत प्रमुख बनलेले आणि प्रिन्सिपॉल श्री.ए.डी.अत्तार, श्री.रा.सु.पाटील आणि बॅरिस्टर पी.जी.पाटील यांची भेट. नंतर जवळच्या संबंधांना सुरुवात.

❖ मे १९३९ कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांची भेट आणि अत्यंत जवळकीच्या संबंधांना सुरुवात. त्यांच्या सामाजिक विचारांचा प्रभाव.

❖ १९३९ साली सखाराम मकदम (वडर) यांच्याशी अत्यंत जिव्हाळयाच्या मैत्रीला सुरुवात. सखाराम मकदम, वाय.सी.पाटील, बापूजी साळुंखे, बी.एल गायकवाड यांच्या मदतीने शिराळा पेटयाच्या अति दुर्गम भागात व्हॉलंटरी शाळांची सुरुवात. १९४०,१९४१ या काळात अण्णांच्या रचनात्मक कामाला सुरुवात

❖ १९३९ डिसेंबरमध्ये कोल्हापूरजवळ सोनतळी येथे सेवादल कॅम्पच्या माध्यमातून राष्ट्र सेवा दलात सहभाग सुरू. तिथे झालेल्या खेळांच्या सर्व स्पर्धामध्ये प्रथम क्रमांक.

❖ मे १९४० कामेरी येथे पहिली विद्यार्थी परिषद आयोजित करण्यात पुढाकार. प्रमुख पाहूणे - बॅ.खर्डेकर, विप्लवी चामुंडराय पाटील व शिंदे महाराज.

❖ १९४० 'हरीजन' या महात्मा गांधींच्या नियतकालिकाचे नियमीत वाचन. गांधींच्या राष्ट्रवादी विचारांचा आणि खादी वापरण्याच्या बाबतीत प्रभाव खादी वापरण्यास सुरुवात.

❖ इस्लामपूर येथे खादी भांडाराची शाखा सुरू. थेरगावचे पांडुरंग पाटील व्यवस्थापक.

❖ हरिजन मधूनच ७ आणि ८ ऑगष्ट १९४२ च्या मुंबई येथील गवालीया टँक (आजचे ऑगष्ट क्रांती) मैदानावर होणा-या आखिल भारतीय कॉग्रेसच्या अधिवेशनाची माहिति मिळाली.

७ आणि ८ ऑगष्ट १९४२ च्या या काँग्रेस अधिवेशनात विद्यार्थी कार्यकर्ता म्हणून सहभाग. या आधिवेशनात झालेल्या 'चले जाव' आणि 'करेंगे या मरेंगे' या घोषणांच्या प्रेरणेतून भूमीगत चळवळीत सहभाग. सुभाषचंद्र बोस यानी सुरू केलेल्या आझाद हिंद फौजेचा सुरुवातीपासूनच प्रभाव.

❖ याच सुमारास 'विप्लवी चामुंडराय' पाटील यांच्याशी मैत्री. भगतसिंग मंडळात सहभाग 'विप्लवी चामुंडराय' यांच्या हुतात्म्यांच्या ''मनिषा कोण पुरी करणार?'' या कवितेचा प्रभाव.

❖ नोव्हेंबर १९४२ मध्ये क्रांतिवीर पांडु मास्तर यानी पुण्याचा येरवडा जेल फोडून क्रांतिवीर किसन वीर, छन्नूसिंग यांच्यासह पलायन केले. ते वाळवे येथे आले. अण्णांची आणि पांडु मास्तरांची भेट झाली. नंतर तेथून मास्तर पसार झाले. पण जेल फोडून आलेला मास्तरांसारखा एक जेष्ठ कार्यकर्ता आणि त्यांच्याजवळ एकही हत्यार नाही ही गोष्ट अण्णांच्या मनाला बोचून राहिली. त्याचवेळी अण्णांनी हत्यारे आणण्याचा निर्धार केला.

❖ १९४२ कोल्हापूर येथे डी.डी.सावंत, जी.ए.लाड, डी.एस.चव्हाण, व्यंकटराव महाडिक(मुगळी) या संचासह बंदुका मिळविण्याविषयी खलबते.

❖ १ नोव्हेंबर १९४२ हत्यार घेतल्याशिवाय परत यायचे नाही असा निर्धार करून गोव्याला रवाना. जाताना खिशात एकही पैसा नव्हता. कोडोलीच्या रंगराव पाटील यांच्याकडून १०० रूपये उसनवार घेऊन निघाले आणि ४४ दिवसांनी १५ डिसेंबर १९४२ ला हत्यार घेऊन माघारी. हत्यारे मिळविण्यासाठी श्री.बाळ मणेरीकर व बापू नार्वेकर यांचे सहकार्य.

❖ ७ जून १९४३ शेणोली जवळ पे-स्पेशल ट्रेन लुटीत सहभाग.

❖ ३ ऑगष्ट १९४३ पणुंब्रे येथे प्रतिसरकारची स्थापना. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नेतृत्व घोषित. क्रांतिवीर अण्णा कार्यकारी मंडळाचे सदस्य.

❖ १० ऑक्टोबर १९४३ सांगाव, जिल्हा कोल्हापूर येथील पोलिस चौकीतून बंदुका पळवण्यात सहभाग.

❖ ऑक्टोबर १९४३ हत्यारे घेऊन सहका-यांसह वाळवे गावात फेरी. फेरी संपवून जात असताना राडेवाडीच्या जोंधळयाच्या रानात पोलिसांचा पाठलाग. शिताफीने सर्वजण निसटले.

❖ १४ एप्रिल १९४४ धुळे खजिना लुटीच्या देशभर गाजलेल्या चित्तथरारक शौर्य गाजवणा-या घटनेत जी.डी.(बापू)लाड, रावसाहेब कळके, उत्तमराव पाटील, किसन पवार (गोंदी), व्यंकटराव रणधीर (धुळे), आप्पा पाटील, शंकर माळी (खाणदेश), यांचेसमवेत पुढाकाराने भाग. धोंडीराम माळी आणि राजुताई (पाटील) बिरनाळे यांचा खजिना भूमिगत केंद्रापर्यन्त आणण्यात मोलाचा सहभाग. धुळे जिल्हयाच्या धुळे तालुक्यातील वडणी या गावचे फकीरआप्पा देवरे यांचा मोठा सहभाग.

❖ २९ जुलै १९४४:- देशद्रोही खब-यांनी फितुरी केल्यामुळे वाळवे येथे पोलिसांचा छापा आणि अटक. खबर देणा-या देशद्रोही खब-यांचे उजवा हात व डावा पाय तोडून टाकले. यामध्ये वाळव्याचे हुताता किसन अहिर, खंडू सखाराम शेळके, सखाराम तुकाराम घोरपडे, किसन देसाई इत्यादी व पडवळवाडीचे तुकाराम नाना खोत (वस्ताद), महादेव राऊ अनुसे (देवास), शाम कुंभार, यशवंत करमाळकर (तात्या) इत्यादी जागृत शेतक-यांचा समावेश.

❖ इस्लामपूर लॉकअप मधून निसटून जाण्याचा कट उघड त्यामुळे ६ सप्टेंबर रोजी सातारा मध्यवर्ती तुरुंगात रवानगी. चौथ्या दिवशीच म्हणजे १० सप्टेंबरला सकाळी ८ वाजता सातारा तुरुंगाच्या

तटावरून उडी मारून सुटका. 'जेलच्या बाहेर आल्याशिवाय एक भाकरी पूर्ण खायची नाही असा निर्धार'. या निर्धारात कामेरीचे एस.बी.पाटील यांचे मोठे सहकार्य.

❖ २६ जानेवारी १९४५ :- कर्मवीर अण्णांच्या ऐतवडे गावी रामानंद भारतींच्या अध्यक्षतेखाली सभा. सभा संपल्यावर क्रांतिविरांगना राजुताईंच्या घरी जेवणाचा कार्यक्रम. जेवण संपवून हात धूत असतानाच डी.एस.पी.गिल्बर्टचा छापा. पाठीमागच्या दारी असलेल्या भिंतीवरून उडी मारून अण्णा शिताफीने पसार. पाठलाग, विहिरीत उतरलेल्या पिंपरणीच्या मुळयांच्या जाळयामागे आधीच पाहून ठेवलेल्या घळीत अण्णांचा आश्रय. गिल्बर्टला विहिरीभोवती घिरटया घालून काहीच कळत नाही. तो हात चोळीत निघून जातो. अण्णा मुक्तपणे निघून जातात. याकामी भिमाण्णा गायकवाड, अंताकाका ढगे, गंगाराम गायकवाड, नामदेव गायकवाड यांचे सहकार्य.

❖ नोव्हेंबर-डिसेंबर १९४५ :- आझाद हिंद फौजेची शाखा तयार करण्यासाठी फौजी प्रशिक्षण देण्याकरता आझाद हिंद फौजेचे मार्गदर्शक आणण्यासाठी दिल्लीला रवाना. आझाद हिंद फौजेतील सैनिकांच्या बाजूने केस चालवणा-या आय.एन.ए.डिफेन्स कमिटी बरोबर श्रीमती मणिबेन पटेल यांच्या माध्यमातून संपर्क करण्याचा प्रयत्न. त्यांना हिंसेचा मार्ग अमान्य असल्यामुळे डिफेन्स कमिटीची वर्गणी भरून विचार करत असतानाच आझाद हिंद फौजेचे सैनिक नानकसिंग आणि मन्सासिंग यांची अचानक भेट. त्यांच्याशी स्वतंत्रपणे बोलून, त्यांना उद्दिष्ट पटवून शिराळा पेटयात फौजी कॅम्पसाठी आणले. फौजी प्रशिक्षणाची अशक्य वाटणारी गोष्ट शक्य करून दाखवली.

❖ २५ फेब्रुवारी १९४६ : सोनवडे आणि मणदूर या गावामधल्या ओढयात ब्रिटिश पोलिसांशी सशस्त्र चकमक. पोलीस शेवटी जीव घेऊन पळाले पण जीवाची पर्वा न करता शत्रूची फळी फोडण्यासाठी सरळ 'धावाबोल' गर्जत पुढे घुसणा-या क्रांतिवीर किसन अहिर अणि नानकसिंग याना गोळया लागल्या. या जखमांमुळेच ते धारातीर्थी पडले आणि हुतात्मा झाले.
पोलिसांना 'दे माय धरणी ठाय' करून पळवून लावणारी शौर्यशाली, दुर्मीळ घटना घडवून स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडात त्यांनी आत्माहुती दिली. अण्णांनी या हुतात्म्यांची जिवंत स्मारके उभी करण्यासाठी आणि त्यांच्या मनिषा असलेले खरे-खुरे स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आपले आयुष्य झिजवण्याचे व्रत घेतले आणि ते तहहयात अमलात आणले.

❖ २२ मे १९४६ :- ऐतवडे येथे कर्मवीर भाऊराव अण्णांच्या अपेक्षेप्रमाणे सामुदायिक शेतीचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी भाऊराव अण्णांच्या शेतासह इतरांची शेती एकत्र करून प्रयोग सुरू करण्याची चर्चा करणारी बैठक. रात्री झोपल्यानंतर गुंडांचा हल्ला. या हल्ल्यात विद्यार्थी दशेतील दोन तरूण सहकारी बाबुराव कोकाटे (पडवळवाडी ता.वाळवा) आणि प्रतापराव पाटील (ब्याकूड - कर्नाटक) मारले गेले. स्वातंत्र्यासाठी हुतात्मा झाले.

❖ १९४६ :- हैद्राबाद मुक्ती लढयात लढणा-या कार्यकर्त्यांना शस्त्रास्त्रांची मदत देणेसाठी जात असताना करमाळा येथे पोलीसांनी अडविले व लोकांनी सोडविले. बार्शीचे दिवाण वकील, छन्नूसिंग, फुलचंद गांधी, सुमती शहा जैन श्राविकाश्रम यांचे सहकार्य लाभले.

❖ १९४६ :- कापील गोळेश्वर ता.कराड येथे विद्यार्थी परिषद संघटित केली. अध्यक्षस्थानी साथी साने गुरूजी. याच परिषदेत रयत शिक्षण संस्थेला एक लाखाचा निधी देण्याचा निर्धार.

❖ १९४६ : साथी एस.एम.जोशी यांच्याकडून समाजवादी पक्षात येण्याचे अण्णांना आवाहन.

❖ १९४६ : राष्ट्रीय नेते जयप्रकाश नारायण यांचे पत्नीसह अण्णांना भेटण्यासाठी वाळवे येथे आगमन. त्यांचाही अण्णांनी समाजवादी पक्षात यावे म्हणून प्रयत्न.

❖ १९४७ :- महार वतनातून येणारी गुलामी संपवण्यासाठी या जमिनी रयतावा करण्याची मागणी करणारा वतन-मुक्तीचा लढा संघटित करण्यासाठी ८० गावांमधून कमिटया स्थापन. पायी प्रवास करून प्रचार. मेळावा संघटित.

❖ २७ नोव्हेंबर १९४८ :- गाडगे महाराजांच्या अध्यक्षतेखाली सातारा येथील धननीच्या बागेत रयत शिक्षण संस्थेसाठी १ लाखाच्यावर रुपयांचा निधी वाय.सी.पाटील, बाबुराव कोकाटे, बापूजी साळुंखे यांच्या समवेत भाऊराव अण्णांच्याकडे सुपूर्द. संस्थेच्या इतिहासातली ही जनतेकडून मिळालेली ऐतिहासिक देणगी.

❖ १९४९ :- श्री.व्ही.एस.अय्यर सर यांच्या प्रोत्साहनाने पून्हा शिक्षणाला सुरुवात मॅट्रीक पूर्ण, एफ.वाय.ला कॉलेजमध्ये शिकत असताना ख-या खु-या स्वातंत्र्यासाठी चळवळ चालू ठेवण्याचा राग येऊन मोरारजी सरकारने आकसाने वारंट काढले त्याच अवस्थेत किर्लोस्कर कंपनीसमोर कामगारांची गेटसभा घेताना अटक. सांगली जेलमध्ये रवाना. शिक्षण पुन्हा खंडीत. वाळवे आणि शिराळा तालुक्यातील ४ ते ५ हजार हत्यारबंद शेतक-यांचा सांगली कलेक्टर कचेरीवर गावा-गावापासून पायी चालत गेलेला मोठा निर्धारी मोर्चा. यामध्ये पडवळवाडी ता.वाळवा या गावचा घरटी शेतकरी. सुटकेची मागणी. अण्णांना सोडणे सरकारला भाग पडले.

❖ १९४९ :- हुतात्म्यांची जिवंत स्मारके उभी करण्याची सुरुवात म्हणून वाळवे येथे किसान शिक्षण संस्थेची व हुतात्मा किसन अहिर विद्यालय आणि हुतात्मा नानकसिंग वस्तिगृहाची स्थापना.

❖ नागनाथ अण्णांना भारतीय कम्युनिस्ट पक्षात घेतल्याची आणि महाराष्ट्र कार्यकारणीवर घेतल्याची पक्षाकडून तार. याच सुमारास कम्युनिस्ट पक्ष आणि नवजीवन संघटनेच्या पुढा-यांसह गोटखिंडी ता.वाळवा येथे बैठक. शिबीर. ४०० लोकांचे अभ्यासमंडळ, कॉ.यशवंत चव्हाण यांची उपस्थिती.

❖ १३ फेब्रुवारी १९५०:- कोल्हापूर येथे श्री. अय्यर सरांच्या घरी सत्यशोधक पद्धतीने लग्न. - सावंतपूर(बुरूंगवाडी) ता.तासगांव,येथील श्री.यशवंत गोविंद कदम पोष्टमास्तर, यांच्या सुकन्या कुसुमताई यांच्याशी अत्यंत साध्या पध्दतीने लग्न झाले. प्रत्यक्ष लग्नासाठी काहीच खर्च आला नाही.

पत्नीला प्रिन्स शिवाजी मराठा फ्री बोर्डिंगमध्येच शिक्षणासाठी ठेवले. त्या बोर्डिंगच्या पहिल्याच रहिवासी विद्यार्थिनी. पुढे बोर्डिंगमध्ये मुलीनासुध्दा वेगळा प्रवेश सुरू. त्या बी.ए.बी.एड. झाल्या जिजामाता (मुलींचे) विद्यालय येथे शिक्षीका आणि मग मुख्याध्यापिका म्हणून काम.

❖ १९५२ :- जनतेने लढून, त्याग करून मिळवलेले स्वातंत्र्य काँग्रेसने भांडवलदार जमिनदार या वर्गाच्या हातात दिले आहे असा निष्कर्ष काढून कामगार-शेतक-यांची लोकशाही सत्ता आणण्यासाठी पुन्हा ख-या खु-या स्वातंत्र्याचा शोध घेण्याची चळवळ सुरू. यासाठी अण्णांची पुन्हा राजकीय चळवळ सुरू. या चळवळीचा भाग म्हणून कामगार किसान पक्ष आणि डावा समाजवादी पक्ष (मार्क्सवादी--लेनिनवादी) यांच्या आघाडीच्या वतीने १९५२ च्या निवडणुकीत विधानसभेचे वाळवे मतदार संघातले उमेदवार.

❖ मे १९५२ :- जुनेखेड ता.वाळवा येथे शेतक-यांचे लेव्ही विरूद्ध आंदोलन भव्य परिषद संघटित. क्रांतिसिंह नाना पाटील, कॉ.दत्ता देशमुख, कॉ.यशवंत चव्हाण यांची उपस्थिती.

❖ १९५६-५७ : संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत पुढाकाराने भाग.

❖ १९५७ :- संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने विधानसभा निवडणूक लढवली निवडणूक जिंकून प्रथमच विधानसभेत प्रवेश. १९५७-६२ आमदार म्हणून कार्य. क्रांतिसिंह नाना पाटील आणि कॉ.दत्ता देशमुख यांच्याशी जवळीक ठेवून चळवळीचे काम चालू.

❖ जून १९६२ :- वाळवे येथे हुतात्मा किसन अहिर विद्यालयात तंत्र शिक्षणाची सोय.

❖ जून १९६३ :- मुलींच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय म्हणून वाळवे येथे जिजामाता विद्यालयाची स्थापना.

❖ जून १९६५ :- वाळवे येथे मुलींच्यासाठी मोफत सावित्रीबाई फुले वस्तिगृहाची स्थापना.

❖ खो-खो आणि बास्केटबॉल सारख्या खेळात महाराष्ट्र आणि अखिल भारतीय पातळीवर यश मिळवणारे खेळाडू वाळवे या ग्रामीण केंद्रात तयार करण्याचे यशस्वी प्रयत्न.

❖ २५ फेब्रुवारी १९७१ :- हुतात्मा किसन अहिर यांच्या अर्ध पुतळयाचे हुतात्मा किसन अहिर विद्यालयासमोर अनावरण. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी क्रांतिसिंह नाना पाटील, स्वागताध्यक्ष कॉ.दत्ता देशमुख, उद्घाटक यशवंतराव चव्हाण, निमंत्रक क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी

❖ पुतळा अनावरण कार्यक्रमानंतर वाळवे ते इस्लामपूर १२ किलोमीटरचा रस्ता डांबरी करण्यासाठी साराबंदी चळवळीला सुरुवात. पोलिसांच्या कवायती आणि बंदुकांना न घाबरता दोन-दोन हजार पुरूष आणि दोन-दोन हजार स्त्रियांचा चळवळीत सहभाग. चार वर्षांच्या सलग साराबंदीनंतर चळवळीला यश. यामध्ये क्रांतिमाता सौ.लक्ष्मीबाई रामचंद्र नायकवडी (आई) यांचा सिंहाचा वाटा.

❖ १९७२ :- किसान लिफ्ट इरिगेशन नं.१ या शेतीला पाणी पुरवठा करणा-या योजनेचे काम पूर्ण.

❖ १९७४-७५ :- साराबंदी लढयाच्याच परिणामी कृष्णा नदीवर नागठाणे येथे कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याचे काम पूर्ण.

❖ आधुनिक शेतीसाठी किर्लोस्कर कंपनीच्या ११ ट्रॅक्टर्सची वाळव्याच्या शेतक-यांसाठी खरेदी.

❖ वाळवा परिसरातील शेतक-यांकडून क्रांतिवीर नागनाथअण्णांना अँब्यासिडर गाडी भेट.

❖ क्रांतिसिंह नाना पाटील कायम निवासासाठी वाळव्यात दाखल. त्यांची अखेरच्या दिवसापर्यंत निष्ठेने सेवा-सुश्रुषा.

❖ फासेपारधी समाजासाठी शिक्षण आणि पुनर्वसनाचा प्रयत्न सुरू.

❖ साराबंदीच्या काळातला थकित सारा शेजारच्या कारखान्याने परस्परच ऊस बिलातून वसूल करून दिला आणि वाळवे परिसरातला ऊस अगदी शेवटी 'गुलाल टाकूनच' नेतात म्हणून 'आमच्या उसाची साखर आम्हालाच करण्यासाठी कारखाना पाहिजे' या मागणीवर प्रयत्न सुरू. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि पंढरपूरचे पुरोगामी बाबाजी (पुरूषोत्तम रंगाचार्य महाराज) यांच्या प्रमुख उपस्थितीत वाळवे येथे शेतक-यांची बैठक. हुतात्म्यांचे जिवंत स्मारक उभारण्याचा भाग म्हणून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखाना उभारण्याचा निर्धार.

❖ १९८१ :- हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला मान्यता मिळवण्यासाठी सलग आठ वर्षे संघर्ष. या संघर्षातून अखेर २६ मार्च १९८१ रोजी कारखान्याला मंजुरी मिळाली. कारखान्याची मंजुरी घेऊनच येणार अशा जिद्दीने दिल्लीला ११ महिने राहून प्रयत्नांची शिकस्त करणा-या अण्णांना यश.

❖ १९८३ :- हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याची ११ महिन्यात उभारणी. पहिला गळित हंगाम सुरू तारीख २९-०१-१९८४.

❖ १९८५ :- वाळवे मतदार संघातून हुतात्मा चळवळीचे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणुक जिंकली.

❖ २६ मे १९८५ :- ऐतवडे बु।। ता.वाळवा जि.सांगली येथे वाळवा व शिराळा तालुक्यातील शेतमजूर, कष्टकरी शेतक-यांची परिषद. ५० हजार लोकांचा सहभाग.

❖ जून १९८५ :-हुतात्म्यांचे जिवंत शैक्षणिक स्मारक म्हणून हुतात्मानगर (सोनवडे) ता.शिराळा जि.सांगली येथे हुतात्मा नानकसिंग विद्यालय व हुतात्मा किसन अहिर मोफत वस्तिगृहाची दुर्गम भागात पहिल्यांदा सुरूवात. तंत्र शिक्षणाची सोय असलेले शिराळा तालुक्यातील एकमेव विद्यालय.

❖ १९८६ :- वारणा धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना.

❖ १९८६ :- सहकारी साखर कारखान्यांचा साखर उतारा (रिकव्हरी) वाढीसाठी अभ्यास व विशेष प्रयत्न. त्याचेच यश म्हणून हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा स्थापनेपासून एक वर्ष वगळता आजपर्यंत सलग साखर उता-यात आशिया खंडात १ ला नंबर

❖ १९८८ :- कोयना धरणग्रस्त संग्राम संघटनेची स्थापना, अभ्यास व त्यांच्या पुनर्वसनासाठी प्रयत्न.

❖ १९८८ :- वाळवे येथे तिसरे आखिल भारतीय दलित, आदिवासी ग्रामीण संयुक्त साहित्य सम्मेलन आयोजित.

❖ १९८८ :- पत्नी समवेत रशिया दौरा.

❖ १९८८ :- वाळवे येथे शेतकरी व कार्यकर्त्यांच्या समाजप्रबोधनपर अभ्यास शिबीराचे आयोजन.

❖ १९८९ ते १९९३ :- दुष्काळग्रस्त तालुक्यातील कुची ता.कवठेमहांकाळ, बेनापूर जुनोनी हिवरा पहाडी (बीड) येथे जनावरांच्या छावन्या उभारून जनावरांच्या चा-याचा प्रश्न मार्गी.

❖ १९८९ :- कराड लोकसभा मतदार संघात प्रथमच लोकसभा निवडणूक लढविली व पराभवातून सुध्दा कॉंग्रेसला मोठा हादरा.

❖ १९९० :- साखर कारखाना झोन (कार्यक्षेत्र) दुरुस्तीची चळवळ.

❖ १९९१ :- कराड लोकसभा मतदार संघात कॉंग्रेस व भाजपा या दोन्हींच्या विरोधात पुन्हा निवडणूक लढविली दिवंगत राजीव गांधींच्या हत्येच्या घटनेपोटी निर्माण झालेल्या सहानुभूतीच्या लाटेनंतर सुध्दा मतांच्या टक्केवारीत लक्षणीय वाढ.

❖ जून १९९२ :- वाळवे येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांचे शैक्षणिक स्मारक म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाची स्थापना.

❖ २५ फेब्रुवारी १९९३ :- बाबरी मशिद पाडणा-या ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तीच्या विरोधात राष्ट्रीय एकात्मतेची वाळवा ते हुतात्मानगर (सोनवडे) ता.शिराळा ८० कि.मी. ची मानवी साखळी.

❖ ८ मार्च १९९३ :- जातीयवादी धर्मांध शक्तींचा बिमोड करण्याची भूमिका घेऊन महाराष्ट्रभर १००० सभा घेण्याचा निर्धार. ३०० सभांच्या पार्श्वभूमिवर २६ मे १९९३ किणी, जिल्हा कोल्हापूर येथे शेतमजूर,कष्टकरी-शेतकरी संघटनेच्या वतीने परिषद ८० हजार स्त्री-पुरूषांची उपस्थिती.

❖ ११ जुलै १९९३ :- समान पाणीवाटप होऊन दुष्काळ कायमचा हटविण्याची मागणी घेऊन चळवळ संघटित करण्यासाठी आटपाडी तालुक्याची भव्य पाणी परिषद ५० हजाराचा जनसमुदाय उपस्थित.

❖ ऑक्टोबर १९९३ :- लातूर, किल्लारी, औसा या भागात झालेल्या प्रलयंकारी भूकंपानंतर भूकंपग्रस्तांना सर्वात प्रथम मदतीचा हात देऊन त्यांची १०८ मुले हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याने दत्तक घेऊन त्यांच्या पालन पोषणाची व पदवी पर्यन्तच्या शिक्षणाची जबाबदारी पार पाडली.

❖ ६ डिसेंबर १९९३ :- ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तींचा बिमोड दिन कोल्हापूरच्या गांधी मैदानावर घेतला. ५० हजाराच्या संख्येने बिमोडाची शपथ.

❖ ६ मे १९९४ :- राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृति दिनाची कोल्हापूर येथे सभा - पुणे विद्यापीठाला राजर्षी शाहूंचे नांव देणेसाठीच्या चळवळीत पुढाकार -- लाखों सहयांची मोहीम. बहुजन समाज पक्षाच्या माध्यमातून उठाव.

❖ ३० सप्टेंबर १९९४:- पुणे विद्यापीठाला राजर्षी शाहूंचे नांव देणेसाठी मुंबईला सचिवालयावर हजारोंच्या संख्येने मोर्चा.

❖ ६ डिसेंबर १९९४ :- ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तींचा बिमोड दिन सोलापूर

❖ जानेवारी १९९५ :- कृष्णा खोऱ्यातील पाण्याच्या हक्काचा समान वाटा मिळविण्यासाठी व कृष्णा खोऱ्यातील पाणी योजनांना गती देण्यासाठी आटपाडी तालुक्यात सारावंदीची चळवळ सुरू.

❖ ६ मे १९९५ :- शेतमजूर कष्टकरी-शेतकरी संघटनेच्या वतीने १ हजार गावात एकाचवेळी 'मनुस्मृतीचे' सामुदायिक दहन मोहिम यशस्वी.

❖ २६ जुलै १९९५ :- कृष्णा खोऱ्यातील पाण्याच्या हक्काचा समान वाटा मिळण्यासाठी सांगली, सातारा, सोलापूर जिल्हयांतील १३ दुष्काळी तालुक्यांतील ८० हजार कष्टकरी स्त्री पुरूषांच्या भव्य पाणी परिषदेचे आटपाडी जिल्हा सांगली येथे आयोजन.

❖ ९ ऑगष्ट १९९५ :- क्रांतिकारी विद्यार्थी संघटनेची स्थापना.

❖ २८ नोव्हेंबर १९९५ :- शेतमजूर कष्टकरी-शेतकरी स्त्री संघटना परिषद.

❖ ६ डिसेंबर १९९५ :- ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तींचा बिमोड दिन कराड.

❖ २०,२१,२२ जानेवारी १९९६ :- दलित,आदिवासी,ग्रामीण संयुक्त साहित्य संमेलन,वाळवे. महाराष्ट्र पातळीवरील साहित्य-संस्कृती क्षेत्रातल्या साहित्यिकांचा मोठा सहभाग.

❖ ३ मार्च १९९६ :- महाराष्ट्र राज्य धरणग्रस्त व प्रकल्पग्रस्त संग्राम संघटनेच्या अध्यक्षपदी निवड.

❖ मे १९९६ :-तिस-यांदा कराड लोकसभा निवडणूक लढवली. यावेळी तिरंगी लढत.

❖ २६ मे १९९६ :- शेतमजूर, कष्टकरी-शेतकरी संघटना वार्षिक अधिवेशन. वाठार ता.कराड.

❖ २६ जुलै १९९६ :- तेरा तालुक्यांची कृष्णा खोरे समान पाणी वाटप परिषद. आटपाडी. ८० हजार जनसमुदाय.

❖ ८ ऑगष्ट १९९६ :- चार जिल्हयांची क्रांतिकारी विद्यार्थी संघटनेची मोठी परिषद. भर पावसात ८ हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी.

❖ ११ सप्टेंबर १९९६ :- विद्यार्थी परिषद सांगली.

❖ ५ नोव्हेंबर १९९६ :- महाराष्ट्र राज्य धरण व प्रकल्पग्रस्त शेतकरी परिषद. धरणग्रस्तांचा मंत्रालयावर मोर्चा १० हजार स्त्री-पुरूषांचा सहभाग.

❖ २१ मे १९९७ :- तासगांव जिल्हा सांगली येथे तेरा तालुक्यांची पाणी परिषद ८०-९० हजार जनसमुदाय.

❖ जून-जुलै १९९७ :- २६ जुलै पर्यंत सर्व तालुक्यांच्या पाणी परिषदा संघटित.

❖ २६ जुलै १९९७ :- आटपाडी येथे तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांची पाणी परिषद.

❖ १३ डिसेंबर १९९७ :- साखर कामगार आणि ऊसकरी शेतकरी यांची महाराष्ट्रव्यापी संयुक्तपरिषद, वाळवे. ४० ते ५० हजार समुदाय.

❖ २० डिसेंबर १९९७ :- सांगली,सातारा,कोल्हापूर अशा तीन जिल्हाधिकारी कार्यालयांवर धरणग्रस्तांचे ठिय्या आंदोलन एकाचवेळी सुरू. सोमवार ता. २९ डिसेंबर १९९७ रोजी धरणे आंदोलन स्थगित.

❖ १९९८ :- भारतीय रिपब्लीकन पक्षाच्या (आर.पी.आय.) चार खासदारांचा वाळवे येथे शेतमजूर कष्टकरी-शेतकरी संघटनेच्या वतीने भव्य सत्कार. सांगली,सातारा कोल्हापूर या तीन जिल्हयातील आर.पी.आय. च्या कामकाजासाठी नवीन टाटा सुमो गाडी देण्याचा हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने निर्णय जाहीर.

❖ २६ जुलै १९९८ :- तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांची भव्य आटपाडी परिषद.

❖ ३० ऑगष्ट १९९८ :- कोल्हापूर येथे हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्यावतीने आर.पी.आय. च्या चार खासदारांना नवीन टाटा सुमो गाडी प्रदान.

❖ २६,२७,२८ ऑक्टोबर १९९८ धरणे आंदोलन आणि २९ ऑक्टोबर १९९८ घेराव आंदोलन असा कार्यक्रम एकाचवेळी तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या तहसिल कचे-यांवर आणि सांगली, सातारा,कोल्हापूर जिल्हयाच्या कलेक्टर कचे-यांवर (धरणग्रस्तांचा कार्यक्रम)

❖ ६ डिसेंबर १९९८ :- ब्राम्हणी जातीयवादी धर्मांध शक्तींचा 'विमोड दिन कोल्हापूर.' 'हुतात्मा' दैनिकासाठी मोहीम जाहीर.

❖ १७ मार्च १९९९ :- दुष्काळग्रस्त आणि धरणग्रस्तांचा शिवाजी पार्क ते आझाद मैदान असा १४ किलोमीटर चालत जाणारा भव्य मोर्चा, मुंबई.

❖ १४ एप्रिल १९९९ :- हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा भव्य कार्यक्रम संपन्न व प्रत्येक वर्षी कार्यक्रम करण्याचा निर्णय.

❖ २७ मे १९९९ :- वाळवे येथे १ कोटी २३ लाख खर्चून अद्ययावत सोईनी युक्त असलेले २०० मुलींच्या रहाण्याची मोफत सोय असलेल्या सावित्रीबाई फुले मुलींच्या वसतिगृहाचे उद्घाटन.

❖ २७ मे १९९९ पासून २७ जून पर्यंत आटपाडी वगळून इतर १२ तालुक्यांच्या पाणी परिषदा मोठया प्रमाणात यशस्वी २८ जुलै आटपाडी परिषदेची तयारी.

❖ २८ जुलै १९९९ :- तेरा तालुक्यांची भव्य पाणी परिषद. येणा-या लोकसभा,विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पाणी संघर्ष चळवळीत व्यक्ती म्हणून आलेले काही पुढारी मंत्री होणार अशी अण्णांची घोषणा (जी पूढे खरी ठरली !).

❖ २६ आणि २७ फेब्रुवारी २००० :- अण्णा दुस-या विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्घाटक झाले. साहित्य संमेलनात दोन्ही दिवस सहभाग.

❖ ८ मार्च २००० :- हिंगणगाव बु।।, ता.खानापूर. अण्णांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळ व धरणग्रस्तांच्या संयुक्त मेळाव्याचे आयोजन.

❖ २६ मार्च २००० :- साखर कामगार, ऊसकरी शेतकरी, धरणग्रस्त आणि दुष्काळग्रस्त यांची भव्य संयुक्त परिषद वाळवे.

❖ १ मे २००० :- तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या तहसिल कचेऱ्यावर दुष्काळग्रस्तांचे आणि सांगली,सातारा,कोल्हापूर कलेक्टर कचे-यांवर धरणग्रस्तांचे मोर्चे.

❖ २६ जून २००० :- तेरा दुष्काळग्रस्त तालुक्यांमधील जनतेचा अण्णांच्या नेतृत्वाखाली सांगली कलेक्टर कचेरीवर भर पावसात भव्य मोर्चा.

❖ २८ ऑगष्ट २००० :- दुष्काळग्रस्त आणि धरणग्रस्तांचा अण्णांच्या नेतृत्वाखाली सांगली कलेक्टर कचेरीवर भव्य संयुक्त मोर्चा.

❖ १६ ऑक्टोबर २००० :- ३-४ हजारांचा धामणी धरण लाभधारक शेतकरी आणि धरणग्रस्तांचा अण्णांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर कलेक्टर कचेरीवर मोर्च.

❖ १ नोव्हेंबर २००० : चालक-मालक (वडाप) संघटना परिषद, किणी. सातारा-सांगली-कोल्हापूर. अध्यक्षस्थानी अण्णा.

❖ २२ नोव्हेंबर २००० :- आटपाडी तालुक्यातील दुष्काळग्रस्तांची अण्णांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक मानवी साखळी

❖ ४ डिसेंबर २००० :- चालक-मालक (वडाप) संघटनेचा अण्णांच्या नेतृत्वाखाली विभागीय आर.टी.ओ. कार्यालय, कोल्हापूर वर भव्य ऐतिहासिक मोर्चा.

❖ २० ते २८ डिसेंबर २००० :- वारणा अभयारण्यग्रस्तांचा वारणा धरणाच्या भिंतीवर ऐतिहासिक लढा. सरकारला "भिक" म्हणून पाणी भत्यापोटी, हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याकडून आठ लाख रुपये.

❖ २०,२१ जानेवारी २००१ :- तिसरे विद्रोही साहित्य संमेलन, औरंगाबाद येथे सन्मानपूर्वक सहभाग.

❖ २२ फेब्रुवारी २००१ :- माधवनगर कॉटन मिल कामगारांचा बंद गिरणी सुरू करण्यासाठी अण्णांच्या नेतृत्वाखाली ऐतिहासिक मोर्चा. धरणग्रस्ताचा पाठिंबा.

❖ ३ एप्रिल २००१ :- आंबेहोळ धरणग्रस्तांवरील दडपशाही विरोधात अण्णांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर कचेरीवर धरणग्रस्तांचे ठिय्या आंदोलन.

❖ ४ एप्रिल २००१ :- अण्णांच्या नेतृत्वाखाली आटपाडी तालुक्यातील दुष्काळग्रस्तांचे ठिय्या आंदोलन.

❖ १३ मे २००१ :- सहकारी साखर कारखान्यांवर केंद्र सरकारने लादलेल्या आयकराचा १ पैसाही द्यायचा नाही आणि आयकर रद्द करणारा कायदा करावा म्हणून चळवळ करण्याचा निर्धार करण्यासाठी ऊसकरी शेतकऱ्यांची परिषद. दुधाळी मैदान, कोल्हापूर. अण्णांचे नेतृत्व. केंद्र सरकारच्या मंत्र्यांना सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांत जाहीर कार्यक्रम करायला बंदी.

❖ १४ मे २००१ :- क्रांतिवीर नागनाथ नायकवडी नगर उर्फ 'क्रांतिवीर नगर' नावाने नव्या उरमोडी धरणग्रस्त गावाचे नामकरण.

❖ २६,२७ मे २००१ :- 'हुतात्मा' नावाने दैनिक सुरू करण्याचा, त्यासाठी प्रकाशन-मुद्रण सहकारी संस्था स्थापन करण्याचा आणि भागधारक बनवून ८ कोटींचे भांडवल जमा करण्याचा ऐतिहासिक निर्णय. महाराष्ट्रातील विद्वान, साहित्यिक मान्यवरांच्या सहभागाने विश्वस्त मंडळाची स्थापना. अण्णांचे नेतृत्व. फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचाराना वाहिलेले दैनिक सुरू करण्याची पुन्हा एकदा जोमाने सुरुवात.

❖ दिनांक २९ ऑगष्ट २००१ :- साखरेवरील आयकर रद्द करणेसाठी मा.केंद्रीय राज्यमंत्री मा.बाळासाहेब विखे पाटील यांना सांगलीवाडी येथे घेराव करणेसाठी हजारोच्या संख्येने जनसमूदाय एकत्रित करणेसाठी पुढाकार.

❖ दिनांक २६ डिसेंबर २००४ :- राष्ट्रीय बंधूता समाज यांच्या वतीने ' क्रांतिदूत पूरस्कार'

❖ दिनांक ७ ऑक्टोबर २००६ :- दैनिक जागृती लोकनेता फोडेशन जयसिंगपूर यांच्यावतीने 'लोकनेते पूरस्कार'

❖ दिनांक ५ नोव्हेंबर २००६ :- जैन फौंडेशन सांगली यांच्या वतीने 'लक्ष पोशिंदा पुरस्कार'

❖ दिनांक ३ सप्टेंबर २००७ :- किसन वीर सहकारी साखर कारखाना लि.भुइंज, ता.वाई, जि.सातारा यांच्या वतीने 'आबासाहेब वीर सामाजिक पुरस्कार' देऊन सन्मानित.

❖ दिनांक १४ डिसेंबर २००७ :- गदिमा प्रविष्ठाण पूणे यांच्या वतीने 'गदिमा स्नेहबंध पुरस्कार'

❖ दिनांक ८ डिसेंबर २००७ :- अण्णांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा गौरव म्हणून शिवाजी विद्यापीठाने क्रांतिवीर अण्णांना डि.लिट ही सन्माननीय पदवी देऊन सन्मानित केले.

❖ शिवप्रभू प्रतिष्ठान पूणे यांच्या वतीने शिवजयंती महोत्सव २००८ रोजी 'राष्ट्रीय स्वाभिमान पुरस्कार'

❖ दिनांक २५ फेब्रूवारी २००८ :- हुतात्मा किसन अहिर यांच्या स्मृतिदिनी कारखाना कार्यस्थळावर हुतात्मा किसन अहिर यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.ना.आर.आर.पाटील यांच्या हस्ते अनावरण.

❖ दिनांक १९ फेब्रूवारी २००९ :- हुतात्मा किसन अहिर विद्यालयाच्या पटांगणावर भारतीय स्वातत्र्य लढयातील थोर स्वातंत्र्य सेनानी व प्रतिसरकारचे प्रणेते क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळयाचे भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई देवीसिंग पाटील यांच्या शुभ हस्ते अनावरण.

❖ दिनांक १४ एप्रिल २००९ :- सामाजिक, राजकीय व स्वातंत्र्य लढयातील कार्याबद्दल भारत सरकारकडून भारताच्या राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते व पंतप्रधान मा.मनमोहनसिंग यांच्या उपस्थितीत 'पद्मभूषण' ही सन्माननीय पदवी देऊन गौरव.

❖ दिनांक २६ जानेवारी २०११ :- अमेरिका स्थित भारतीयांच्या साधना ट्रस्ट व महाराष्ट्र फौंडेशन यांच्या वतीने पूणे येथे 'जिवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मानित.

❖ दिनांक २८ ऑगष्ट २०११ :- लोकनेते बाळासाहेब (काका) पाटील यांच्या स्मरणार्थ सामाजिक कार्याबद्दल 'समाजभूषण' पुरस्काराने सन्मानीत.

❖ तहहयात दुष्काळग्रस्त जनतेच्या तृषार्त हाकेला साथ देऊन प्रचंड चळवळीद्वारे पाणी प्रश्नांची तड लावण्याच्या त्यांच्या महान कार्याचा परिपाक म्हणजे कृष्णा खोरे विकास महामंडळाची स्थापना होय.

या महामंडळाद्वारे आज १३ दुष्काळग्रस्त तालुक्यातील जनतेस टेंभू, ताकारी, म्हैशाळ या उपसा जलसिंचनाच्या मोठया योजनांमूळे पाणी मिळणेस व त्यांचा दुष्काळ हटविणेस मदत होणार आहे.

❖ २२ मार्च २०१२ रोजी महान क्रांतिकारक पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नागनाथअण्णाचे महानिर्वाण.